श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

वर्ष-८, अंक-२अ | फेब्रुवारी-२०२० | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ८

## इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट' संचालित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत ७१ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाचा सोहळा ट्रस्टच्या भव्य क्रीडासंकुलात उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सन्माननीय श्री. अशोक चौगुले, सहव्यवस्थापकीय संचालक, चौगुले अँड कंपनी प्रा. लि. व सन्माननीय अतिथी डॉ. प्रल्हाद प्रभुदेसाई, चेस्ट फिजिशियन, मुंबई हे उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण करून राष्ट्रगीताने व ध्वजगीताने प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याचा प्रारंभ झाला. सर्व उपस्थितांनी भारताच्या संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'जे देशासाठी लढले ते अमर हुतात्मे झाले' या देशभक्तिपर गीताने सुयोग्य वातावरण निर्मिती झाली. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी विविध कवायतींचे सादरीकरण अत्यंत लयबद्ध पद्धतीने केले.

शाळेत विद्यार्थ्यांना भारतीय भाषांबरोबरच जर्मन आणि स्पॅनिश या परदेशी भाषादेखील शिकविल्या जातात. भारतीय संस्कृती, परंपरा, विविधतेतील एकता, राष्ट्रध्वजाचे महत्त्व, ऐतिहासिक वारसा, भारतीयांचे विविध क्षेत्रातील योगदान व प्रगती, भारतीयांची देशाप्रती कर्तव्ये, आमच्या स्वप्नातला भारत, अशा महत्त्वपूर्ण घटकांवर शिशुगटापासून उच्च माध्यमिक गटापर्यंतच्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी, संस्कृत, जर्मन व स्पॅनिश भाषांमधून अभ्यासपूर्ण, मुद्देसूद भाषणे ओजस्वीरीत्या सादर करून सर्वांनाच आपल्या वक्तृत्वाने प्रभावित केले. संस्कृत, जर्मन व स्पॅनिश भाषणांचे इंग्रजीत भाषांतर करण्यात आले. पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी वय लहान असूनही परक्या भाषेत न अडखळता हावभावासहित आपले वक्तृत्वकौशल्य दाखविले. भव्य समारंभ, प्रतिष्ठीत अतिथी व श्रोतृजनांसमोर विद्यार्थ्यांनी निर्भिडपणे आपली भाषणे सादर केली असून त्यातून सभाधीट वृत्ती व नेमून दिलेल्या कर्तव्याची उत्तम तयारी दिसून आली.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून श्री विठ्ठलराव जोशी स्पोर्ट्स अकादमीमधून नियमित सराव करून आर्चरी, स्विमिंग, मल्लखांब,



प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण

योगा, रायफल शूटिंग ह्या क्रीडा प्रकारात राष्ट्रीय व राज्य स्तरावर घवघवीत यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके प्रदान करून गौरविण्यात आले.

मल्लखांब या क्रीडाप्रकारात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यावाचस्पती गणेश प्रभाकर परांजपे पुरस्कार रोख रु.३५००/- दिला जातो. या वर्षी राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धेत सुवर्ण पदकाचा मानकरी ठरलेल्या इ. दहावीतील निहाल दिनेश विचारे



उपस्थित मान्यवर

या विद्यार्थ्याला या पुरस्काराने गौरविण्यात आले. निहाल याने राज्यस्तरावरही सुवर्ण पदक पटकावले आहे.

राष्ट्रीय इनडोअर आर्चरी स्पर्धेत इ. आठवीतील सिद्धी साळुंखे हिने वैयक्तिक खेळात २ सुवर्ण पदके व १ सांघिक सुवर्ण पदक तसेच आऊटडोअर आर्चरी स्पर्धेत ५० मी. रिकर्व्ह प्रकारात रौप्य पदक व सांघिक सुवर्ण पदक प्राप्त केले. आदित्य गुहागरकर याने



नर्सरीतील विद्यार्थी – शिवांश मांडवकर

राष्ट्रीय इनडोअर आर्चरी स्पर्धेत वैयक्तिक खेळात रौप्य पदक व सांघिक सुवर्ण पदक प्राप्त केले तसेच आऊटडोअर आर्चरी स्पर्धेत इंडियन प्रकारात सांघिक कांस्य पदक संपादन केले. इ. दहावीतील रूपल पटेल हिने राष्ट्रीय इनडोअर आर्चरी स्पर्धेत सांघिक सुवर्ण पदक प्राप्त केले. या विद्यार्थ्यांना शाळेतर्फे प्रत्येकी रू. ३०००/– चे पारितोषिक प्रदान करण्यात आले.

राष्ट्रीय योगासन स्पर्धेत इ. सातवीतील स्वरा गुजर या विद्यार्थीनीने सांघिक कांस्यपदक पटकावले. मैत्री जाधव या अकरावीतील विद्यार्थीनीने राष्ट्रीय रायफल शूटिंग स्पर्धेत सांघिक सुवर्णपदक प्राप्त केले. शाळेकडून प्रत्येकी रु.३०००/– चे पारितोषिक देऊन त्यांना गौरविण्यात आले.

राज्यस्तरावर फिल्ड आर्चरीमध्ये वैयक्तिक खेळात रौप्यपदक प्राप्त करणाऱ्या इ. सातवीतील तनिष्क राणे व सांघिक कांस्य पदक प्राप्त करणाऱ्या इ. बारावीतील कुंजल घाग या विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने प्रत्येकी रू.२०००/– चे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

यासोबतच राज्यस्तरावर खेळात सहभागाबद्दल रायफल शूटिंग प्रकारात इ. आठवीतील श्रेया भागवत, जलतरण क्रीडाप्रकारात इ. दहावीतील यज्ञित वारे, इ. बारावीतील प्रेमसागर चव्हाण,



ज्युनिअर के.जी. विद्यार्थी – तनिष्क लोकरे



इ. दुसरीमधील – दित्या जाधव



शारीरिक कवायत सादर करताना विद्यार्थी



'ने मजसी ने परत मातृभुमीला' या गीतावर नृत्य सादर करताना विद्यार्थी

इ. आठवीतील श्रावणी वालावलकर आणि इ. सातवीमधील तनिष्क कदम यांना प्रत्येकी रु.१०००/– पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

पारितोषिक वितरण समारंभानंतर आदरणीय अतिथी डॉ.प्रल्हाद प्रभुदेसाई आपल्या भाषणात बोलताना म्हणाले की, सुसज्ज शाळा, भव्य क्रीडासंकुल असणाऱ्या ठिकाणी मला येण्याची संधी दिली याबद्दल मी श्री.विकासराव वालावलकर यांचे आभार मानतो. ते पुढे म्हणाले, प्रत्येक व्यक्ती ही विद्यार्थी असते. ती कायम शिकत असते. विद्यार्थ्यांनी मार्कांना अवाजवी महत्त्व न देता, त्या विषयाचा सखोल अभ्यास करून त्यात प्रावीण्य मिळविले पाहिजे. डॉक्टर या नात्याने विद्यार्थ्यांना सल्ला देताना ते म्हणाले, जर तुम्हाला हा देश निरोगी बनवायचा असेल तर तुम्हाला पौष्टिक आहार घेणे आवश्यक आहे. पौष्टिक आहार हा महाग नसतो. दुसरी गोष्ट म्हणजे मुलांनी मोकळ्या वातावरणात, मैदानात खेळले पाहिजे. तिसरी महत्त्वाची गोष्ट सांगताना ते म्हणाले की, आपल्या जीवनात छंद जोपासणे आवश्यक असते. वाचन, गायन, नृत्य इ. कोणताही असो. छंदानेच तुम्ही तुमचे व्यक्तिमत्त्व घडवू शकाल. ते आपल्या भाषणात पुढे म्हणाले, नम्रता हा गुण विद्यार्थ्यांनी अंगीकारला पाहिजे, तसेच शिक्षकांबद्दल कृतज्ञता बाळगली पाहिजे. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी झोप ही देखील महत्त्वाची भूमिका बजावत असते असे सांगून सर्वांनी पुरेशी झोप घेतली तर त्यामुळे स्मरणशक्ती आणि आकलनशक्ती वाढते असे सांगितले. सर्व विद्यार्थ्यांनी विषयाचा सखोल अभ्यास, पौष्टिक आहार, व्यायाम, निद्रा, छंद, नम्रता यांचे पालन केले तर तुम्ही एक आदर्श विद्यार्थी व एक आदर्श नागरिक होऊन आपल्या देशाला एक महान राष्ट्र बनवू शकाल असा मौलिक संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

प्रमुख पाहुणे श्री. अशोकराव चौगुले सर्व उपस्थिताना संबोधित करताना म्हणाले, एका ग्रामीण भागात विकसित केलेल्या सर्व शैक्षणिक व क्रीडा सुविधा पाहून मला या गोष्टीचा अभिमान आहे की, मी अशा समाजाचा भाग आहे, ज्यामध्ये पूजनीय श्रीकाकामहाराज व श्री. विकासराव वालावलकरसाहेब यांसारखी थोर माणसे लोकोपयोगी कार्य करून इतरांना प्रेरित करीत आहेत. भारतात अशा प्रकारच्या सुविधा मिळणे दुर्मिळ आहे. मी आपणा सर्वांस विनंती करतो की, सर्व विद्यार्थ्यांनी इथे असलेल्या सुविधांचा उपयोग करून आपली कौशल्ये विकसित करावीत. विद्यार्थ्यांनी



'आओ बच्चो तुम्हे दिखाए' या देशभक्तीपर गीतावर सीनिअर के.जी. च्या विद्यार्थ्यांचे सादरीकरण



*देशाच्या रक्षणाकरिता स्वत:च्या प्राणाचीही पर्वा न करणाऱ्या सैनिकांच्या समर्पणाचे सादरीकरण*



*मल्लखांबावरील चित्तथरारक कसरतींचे सादरीकरण*

नेतृत्वगुण अंगीकारावेत यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल असा संदेश दिला की, नेता हा केवळ राजकारणातूच निर्माण होत नाही तर सर्वसामान्यातूनही निर्माण होतो. तुम्ही आयुष्यात असे कार्य करा की आपल्या राष्ट्राच्या कल्याणाकरिता स्वत:चे योगदान देऊ शकाल, यातूनच राष्ट्रकार्य घडेल. आपल्या देशाची प्राचीन संस्कृती जपणे ही केवळ विद्यार्थ्यांचीच नव्हे तर आपण सर्व देशवासियांची जबाबदारी आहे असे सांगून येथील विद्यार्थ्यांनी भाषणाद्वारे मांडलेले विचार ऐकण्याची संधी मिळाली त्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

यानंतर विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम सादर केला. पाचवीच्या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर रचित 'ने मजसी ने' या गीतावर नृत्य सादर केले. 'आओ बच्चो तुम्हे दिखाए' या देशभक्तिपर गीतावर सीनिअर के.जी. च्या विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणातून एकता व अखंडतेचे महत्त्व अधोरेखित केले. इ. तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी डंबेल्स, रिंग आणि फ्लॅग यांचा वापर करून शिस्तबद्ध कवायती सादर केल्या.

आपल्या देशाच्या सीमेवर तैनात असणारे सैनिक वैयक्तिक जीवनापेक्षा देशाचे रक्षण हे प्रथम कर्तव्य मानतात आणि देशाच्या रक्षणाकरिता स्वत:चे प्राणही अर्पण करतात. कर्तव्यदक्ष सैनिकांच्या समर्पणाचे दर्शन इ.११ वीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणातून घडवले व साऱ्यांचेच हृदय हेलावून गेले.

आपल्या भारतात पूर्वीपासूनच उत्तम आरोग्यासाठी योगासनांना महत्त्व देण्यात आले आहे. तसेच मल्लखांब हा आपला प्राचीन सर्वांगसुंदर व्यायाम प्रकार. या शाळेमध्ये मल्लखांब व योगासनांचे शिक्षण अगदी लहान वयापासूनच दिले जाते. शारीरिक लवचिकता दर्शविणारे योगनृत्य व मल्लखांबावरील चित्तथरारक कसरती सुलभरीत्या सादर करून राष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटवणाऱ्या विद्यार्थ्यांनी शारीरिक व मानसिक संतुलनाचा सुंदर मिलाफ प्रदर्शित केला व सर्वच उपस्थितांची वाहवा मिळवली.

कार्यक्रमाच्या शेवटी रणवाद्यांच्या तालावर इ. सहावी व सातवीतील विद्यार्थ्यांच्या झांज पथकाने लय व तालबद्ध कवायत सादर करून साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले.

कार्यक्रमानंतर सर्व मान्यवरांनी पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेला भेट दिली. शाळेच्या सुसज्ज विज्ञान प्रयोगशाळा, अत्याधुनिक संगणक कक्ष, समृद्ध ग्रंथालय,



*सन्माननिय अतिथी डॉ. प्रल्हाद प्रभुदेसाई विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना*



*प्रमुख पाहुणे श्री. अशोक चौगुले उपस्थितांना संबोधताना*

'चाईल्ड फ्रेंडली' चित्रमय पूर्वप्राथमिक वर्ग यांना भेट देऊन समाधान व्यक्त केले. तसेच शाळेच्या 'अटल टिंकरींग लॅबॉरेटरी' मध्ये विद्यार्थ्यांनी स्वत: तयार केलेल्या वैज्ञानिक उपकरणांबद्दल माहिती दिली. 'आर्ट् ॲन्ड क्राफ्ट' दालनामध्ये विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या आकर्षक पेपर बॅग्ज, मेणबत्त्या, सिरॅमिक पॉट्स, गणेश मूर्ती, पेन्टिंग्ज, वॉल हॅन्गिंग्ज, पणत्या, इ. कलाकृतींच्या प्रदर्शनाला सर्व मान्यवरांनी भेट दिली.

या कार्यक्रमाला संस्थेचे प्रमुख विश्वस्त श्री. अशोकराव जोशी, कार्यकारी विश्वस्त मा. श्री. विकासराव वालावलकर, वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. आनंद जोशी, डॉ. संजय देशपांडे व यु.के. मेडिकल टीम तसेच संस्थेच्या हॉस्पिटल, शाळा व विविध शैक्षणिक शाखांतील विद्यार्थी, शिक्षक, डॉक्टर्स, कर्मचारी व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रजासत्ताकदिन कार्यक्रमावर एक अभिप्राय

मी गेली अकरा वर्षे बालरोग तज्ज्ञ म्हणून काम करीत असल्याने माझा संबंध मुलांशीच जास्त येतो. या वेळचा प्रजासत्ताक दिन (२०२०) माझ्यासाठी संस्मरणीय ठरला आहे कारण डेरवण शाळेतील मुलांचे सुंदर कार्यक्रम मला पाहता आले आणि तेही श्रीकाकामहाराज तेथे स्वत: उपस्थित असताना!

डेरवण येथील शाळेत मुलांना दिले जाणारे उत्कृष्ट शिक्षण आणि त्यांच्या मनामध्ये केले जाणारे देशभक्तीचे बीजारोपण पाहून मी शाळेचे विश्वस्त, मुख्याध्यापकांसह सर्व शिक्षक आणि श्रीकाकामहाराज यांचे अभिनंदन करतो कारण असे कार्य त्यांच्यासारख्या थोरामोठ्या लोकांकडूनच होऊ शकते.

अत्यंत चैतन्यदायी वातावरणात समारंभ अगदी वेळेवर सुरू झाला. पाहुण्यांचा परिचय झाल्यावर मुलांनी आपले विचार व्यक्त करायला सुरुवात केली. कु. शिवांश मांडवकर या तीन वर्षाच्या मुलाने अचूक उच्चारणासह केलेले अस्खलित इंग्रजी भाषण ऐकून मला आश्चर्याचा धक्काच बसला. महानगरातील त्याच्या वयाच्या मुलांमध्ये एवढा आत्मविश्वास आणि असे दर्जेदार इंग्रजी पाहायला मिळेल का असा विचार माझ्या मनात आला. एकंदरीतच या शाळेने आपल्यासाठी अत्यंत उच्च असा दर्जा प्रस्थापित केला आहे. सगळ्या मुलांची भाषणे उत्तम झाली आणि ब्रिटिश वैद्यकीय पथकाने जेव्हा या आत्मविश्वासाने भाषणे करणाऱ्या मुलांना टाळ्या वाजवून प्रोत्साहित केले तेव्हा मला फार अभिमान आणि आनंद वाटला.

नंतर मुलांनी संस्कृत, स्पॅनिश आणि जर्मनमधून भाषणे केली तेव्हा तर अधिकच आश्चर्य वाटले आणि खात्री झाली की ही साधीसुधी नाही तर एक वेगळीच वैशिष्ट्यपूर्ण अशी शाळा आहे.

केवळ भाषणेच नव्हते तर नंतर मुलांनी सादर केलेले कार्यक्रमही कौतुकास्पद होते. त्यातील काहींचा उल्लेख केला नाही तर अन्यायाचे होईल. मुलांनी सादर केलेले 'वंदे मातरम्' आणि नंतर 'मुघलांना आपल्या तलवारीचे पाणी दाखविणारे छत्रपती श्री शिवाजी महाराज' हे कार्यक्रम थक्क करणारे होते. योगाची प्रात्यक्षिके योगाचे महत्त्व दाखविणारी अशीच होती. जिम्नॅस्टिक आणि मल्लखांबाची प्रात्यक्षिके पाहून तर असे वाटले की मी थोडा आधी जन्माला आलो! जर मी २५ वर्षे उशीरा जन्मलो असतो तर या सुंदर शाळेत शिकण्याचे भाग्य मला मिळाले असते. मल्लखांबाची प्रात्यक्षिके दाखविणारे सगळे शालेय विद्यार्थी कसलेल्या व्यावसायिक खेळाडूंएवढे कुशल वाटत होते.

मग अकरावीतील मुलांनी सैनिकी जीवनावर सादर केलेला जोषपूर्ण कार्यक्रम पाहून डोळे ओलावले. शहीद सैनिकाच्या शवपेटीवर पुष्पचक्र वाहिले जाते हा प्रसंग पाहताना मी माझ्या भावना आवरू शकलो नाही! या सुंदर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक आणि व्यवस्थापनाला किती परिश्रम करावे लागले असतील, या कार्यक्रमासाठी लागलेले विविध पोशाख, सादरीकरणाच्या वेळची अचूकता आणि सर्व कार्यक्रमाचे सादरीकरण याचा विचार करता आश्चर्य वाटते.

या शाळेशी मी कुठेतरी जोडला गेलेला आहे याचा मला फार अभिमान वाटतो! जय हिंद!

**– डॉ. सदानंद शेट्ये**

# ‘लोकमान्य टिळक स्मृती व्याख्यानमाला’

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टतर्फे ‘लोकमान्य टिळक स्मृती शताब्दी’वर्षानिमित्त ‘लोकमान्य टिळक स्मृती व्याख्यानमाला’ आयोजित करण्यात आली आहे. दर महिन्याला एक व्याख्यान सत्र आयोजित करण्यात येणार असून लो. टिळकांच्या जीवन आणि कार्यावर अधिकारी व्यक्ती आपले विचार व्यक्त करतील. दि.२० जानेवारी २०२० रोजी डॉ. आदित्य शंकरराव अभ्यंकर (MS, PhD, Clarkson University, USA) विभागप्रमुख, तंत्रज्ञान विद्याशाखा, पुणे विद्यापीठ यांनी या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफले.

प्रथम भ.क.ल.वालावलकर रुग्णालयाच्या परिसरात उभारलेल्या लोकमान्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून ट्रस्टच्या सभागृहात श्रोत्यांसमोर बोलताना डॉ. अभ्यंकर म्हणाले, ‘‘लोकमान्य टिळकांनी अभूतपूर्व असे जे कार्य करून ठेवलंय ते कोणत्या पार्श्वभूमीवर झाले आहे हे थोडसं समजून घेणं आवश्यक आहे. म्हणजे मग त्याची व्याप्ती आपल्याला अधिक चांगल्या पद्धतीने लक्षात येईल. लोकमान्य टिळकांचा जन्म १८५७ चं जे स्वातंत्र्यसमर झालं त्याच्या फक्त एक वर्ष आधी, १८५६ साली झाला. त्या वेळेला भारतवर्षात काय परिस्थिती होती याचा आपण थोडासा आढावा घेऊ या म्हणजे कोणत्या पार्श्वभूमीवर टिळकांना काम करावं लागलं आणि केवढं विलक्षण कार्य त्यांच्या हातातून घडलं हे आपल्या सहज लक्षात येईल.

१८५७ चं जे स्वातंत्र्यसमर झालं, ज्याला ब्रिटिशांनी ‘बंड’ असं नाव दिलं, त्यानंतर ब्रिटिशांना एक गोष्ट कळून चुकली, जर एतद्देशीयांना आपण ब्रिटिश शिक्षण दिलं नाही तर अशा प्रकारची बंडं भारतात वारंवार होत राहणार आणि म्हणून त्यांनी एतद्देशीयांना ब्रिटिश शिक्षण देण्यास सुरुवात केली. तुमच्या लक्षात आलं का? भारतावर यापूर्वी जी आक्रमणं झाली होती ती सगळी आक्रमणं खुल्या स्वरूपाची, उघड उघड होती. पण ब्रिटिशांनी जे आक्रमण आपल्या भारत वर्षावर केलं ते अत्यंत छुप्या पद्धतीचं होतं. त्यांनी आपल्या संस्कृतीवर घाला घातला. त्यांनी आपल्या परंपरा मोडून टाकण्याचा चंग बांधला. त्यांनी आपली जी जी मर्मस्थाने होती, जी बलस्थाने होती त्या सगळ्यावर आघात घालण्याचा प्रारंभ केला आणि त्याच्यासाठी त्यांनी माध्यम बनवलं ते शिक्षण. इथून जवळच असणाऱ्या रत्नागिरी जिल्ह्यातील चिखली या गावी लोकमान्य टिळकांचा २३ जुलै १८५६, आषाढ वद्य षष्ठी, सूर्योदयानंतर केवळ २ घटिकांनी जन्म झाला. १८६६ मध्ये टिळक पुण्यात आले. टिळकांनी १८७१ मध्ये मॅट्रिकची परीक्षा दिली. याच वर्षी टिळकांचा विवाहसुद्धा झाला. १८७४–७५ मध्ये टिळकांनी बी.ए. ची परीक्षा गणित या विषयामधून पूर्ण केली. १८७७–७८ साली त्यांनी वकिलीचा अभ्यास सुरू केला आणि १८७९ साली टिळक एलएल.बी. ची परीक्षा उत्तीर्ण झाले.




*डेरवण हॉस्पिटल परिसरातील लो. टिळक स्मारक*



*डॉ. आदित्य अभ्यंकर लो. टिळकांना अभिवादन करताना*

पण १८८० हे साल महत्त्वाचं होतं आणि त्या वेळेला विष्णूशास्त्री चिपळूणकरांचं कार्य धगधगीत वैराग्याप्रमाणे समाजाच्या पुढे येत होतं. विष्णूशास्त्रींना बाल गोपाळ असे दोन छान शिष्य मिळाले. यातला बाल म्हणजे बाळ गंगाधर टिळक आणि गोपाळ म्हणजे गोपाळ गणेश आगरकर. या दोघांनी एकत्र येऊन १८८० ते १८८४ या चार-पाच वर्षात इतकं विलक्षण कार्य करून ठेवलेलं आहे की आजसुद्धा तुम्ही पुण्यात आलात तर त्याची प्रचिती तुम्हाला पावलोपावली मिळेल. दि. २ जानेवारी १८८० ला या दोघांनी चिपळूणकरांच्या मार्गदर्शनाखाली न्यू इंग्लिश स्कूल या शाळेची सुरुवात केली. १८८१ मध्ये एक बंद पडलेला कारखाना या दोघांनी भाडेतत्त्वाने चालवायला घेतला आणि 'मराठा' आणि 'केसरी' ही दोन वृत्तपत्रे सुरू केली. १८८४ साली 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'ची निर्मिती करण्यात आली. या सोसायटीच्या माध्यमातून २ जानेवारी १८८५ पासून 'फर्ग्युसन कॉलेज' कार्यरत झालं. म्हणजे तुम्हाला लक्षात येईल केवळ चार ते पाच वर्षात या द्वयींनी, टिळक आणि आगरकरांनी, विष्णूशास्त्री चिपळूणकरांचे काम सहस्रपटीने मोठं करून दाखवलं.

१८८४ साली ब्रिटिशांनी मुलींसाठी लग्न करताना वयाची काय अट असावी याची सुधारणा करण्यासाठीचा एक कायदा आणला. आणि इथे ठिणगी पडली. मतभेदांना सुरुवात झाली. आगरकरांचं असं म्हणणं होतं की धार्मिक सुधारणा झाल्याच पाहिजेत. मग ते ब्रिटिशांच्या माध्यमातून होतात का आपल्या माध्यमातून होतात याला जास्त महत्त्व नाही. पण धार्मिक सुधारणा झाल्याच पाहिजेत. आणि टिळकांच मत होतं, धार्मिक सुधारणा झाल्याच पाहिजेत पण त्या ब्रिटिशांनी करून नव्हे तर आपल्या माध्यमातून झाल्या पाहिजेत. आपला धर्म, आपला इतिहास, आपली संस्कृती आपण जाणतो. ब्रिटिशांनी त्यात ढवळाढवळ करण्याचे काही कारण नाही. आणि इथून मतभेदाला सुरुवात झाली. टिळक आणि आगरकर यांचे दोन स्वतंत्र पंथ, स्वतंत्र संप्रदाय निर्माण झाले. आगरकर फुटून बाहेर पडले आणि सुधारक नावाचं त्यांचं स्वतःचं मुखपत्र सुरू केलं. आणि शेवटी १८८९ मध्ये टिळकांनी 'डेक्कन एजुकेशन'चा राजीनामा दिला. १८८० ते १८८८-८९ अशी १० वर्षे टिळकांनी शैक्षणिक काम केलं. पण त्यांच्या लक्षात आलं की शैक्षणिक कामाबरोबरच राजकीय काम केलं पाहिजे, सामाजिक कामही केलं पाहिजे. समाजातल्या तळागाळापर्यंत पोहचलं पाहिजे.

१८९३-९४ साली सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. आणि आज त्याचे व्यापक स्वरूप आपल्याला पाहायला मिळते आहे. यामुळे समाजातील दरी निघून गेली. भिन्न विचारांची लोकं एकत्र आली. एवढ्यावरच ते थांबले नाहीत. भक्तीला शक्तीचे कवच लागते आणि म्हणून १८९५ला डिसेंबरमध्ये एक मोठी सभा झाली त्यात त्यांनी रायगडावर शिवाजीमहाराजांचे भव्य स्मारक उभारण्याचा प्रस्ताव मांडला आणि १८९६ पासून टिळकांनी शिवाजीमहाराजांचे रायगडावर भव्य स्मारक उभे करून उत्सव सुरू केला.

१८९७ ला पुण्यात प्लेगची साथ आली. त्या वेळी अत्यंत जुलमी अशा कलेक्टर रँडवर २२ जून १८९७ या दिवशी चाफेकर बंधूंनी रात्री हल्ला केला. टिळकांनी केसरीतून एक झणझणीत अग्रलेख लिहिला. १८९७ मध्ये रॅन्डचा वध झाला त्याच्यानंतर पुण्यातले अत्याचार कमी होण्याऐवजी वाढलेच आणि टिळकांनी अप्रतिम अग्रलेख लिहिला होता. त्याचं शीर्षक होतं, 'सरकारचं डोकं ठिकाणावर आहे का?' आणि या अग्रलेखासाठी टिळकांना राजद्रोहाच्या खटल्याला सामोरं जावं लागलं.

१८९८-९९ मध्ये त्यांना सश्रम कारावास भोगावा लागलेला आहे आणि तुम्हाला माहीत आहे की टिळकांची कीर्ती आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचलेली होती. राजद्रोहाचा खटला जेव्हा उभा राहिला तेव्हा टिळकांच्या वतीने वकिलपत्र कोणी घ्यायचे? तर टिळकांचे जे बंगालमधले सगळे मित्र होते, त्यांनी एक बॅरिस्टर पाठवून दिला आणि त्यांनी टिळकांचा हा सगळा खटला चालवला त्याचा संपूर्ण खर्च त्या बंगालच्याच सगळ्या मित्रांनी उचललेला होता.

एवढंच नाही; जेव्हा टिळकांना शिक्षा सुनावण्यात आली तेव्हा प्रोफेसर मॅक्समुल्लरना त्याचं अत्यंत दुःख झालं आणि मॅक्समुल्लरनी



*डॉ. आदित्य अभ्यंकर व्याख्यान देताना*

एक परिषद बोलावली की ज्यामध्ये २२ आंतरराष्ट्रीय ख्यातीचे प्राध्यापक होते आणि या २२ प्राध्यापकांनी खाली सही करून ब्रिटिश सरकारला एक पत्र पाठवून दिलं आणि त्यात टिळकांना सोडण्यात यावं अशी याचिका दाखल केलेली होती आणि याचा परिणाम म्हणून टिळकांची शिक्षा कमी झाली. १८ महिन्यांच्या ऐवजी बाराच महिने त्यांना शिक्षा झाली आणि ती शिक्षा भोगून टिळक परत आले.

परत आल्यानंतर १८९९ मध्ये परत 'मराठा'मध्ये त्यांनी एक अप्रतिम अग्रलेख लिहिलेला होता. त्या अग्रलेखाचं शीर्षक होतं 'पुन:श्च हरिओम!' आता पुन्हा पहिल्यापासून सुरुवात करायची. १९०० साली टिळकांमधला संशोधक जागा झाला आणि टिळकांच्या असं लक्षात आलं की आपलं जे पंचांग आहे ते सदोष आहे आणि निर्दोष पंचांग छापण्यासाठी टिळकांनी त्यांच्या सामाजिक कार्यातून संन्यास घेतला. १९०० ते १९०३ जवळ जवळ ३ ते ४ वर्ष टिळक सिंहगडावर त्यांच्या बंगल्यात वास्तव्याला होते आणि दर रात्री ग्रह, तारकांची आकडेमोड करण्यात त्यांचा वेळ जात असे. आपली तैलबुद्धी टिळकांनी निर्दोष पंचांग तयार करण्यात खर्ची घातली आणि १९०० सालाच्या समाप्तीला टिळकांनी हे निर्दोष पंचांग छापून प्रसिद्ध सुद्धा केलं. १९०३ साली त्यांनी जो ग्रंथ प्रकाशित केला त्याचं नाव आहे "The Arctic Home in Vedas" किंवा आर्यांचे मूळ वसतीस्थान. टिळकांचं हे जे मूलभूत संशोधन आहे ते पायाभूत आहे.

१९०७ साली वंगभंग चळवळ सुरू झाली आणि आपल्या बंगालमधल्या सगळ्या बांधवांना टिळकांनी विलक्षण मदत केलेली आहे. दुर्दैवाने टिळकांवर राजद्रोहाचा दुसरा खटला भरण्यात आला. साल होतं १९०८ आणि टिळकांचा हा खटला चालवला होता तो बॅरिस्टर जीना यांनी आणि नंतर टिळक फक्त आणि फक्त सत्य बोलत आहेत असं म्हटल्यावर बॅरिस्टर जीना यांनी तो प्रयत्न मध्येच सोडून दिला आणि मग टिळकांनी स्वत:च तो खटला पुढे चालवला. ब्रिटिश सरकारने टिळकांना सहा वर्षांकरता मंडालेच्या तुरुंगात पाठवलं. सोने जसे अग्नीत टाकल्यानंतर ते झळाळून बाहेर येते तसे ही जी असामान्य व्यक्तिमत्त्वं असतात ती झळाळून त्यातून बाहेर येतात. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी अंदमानला 'कमला' नावाचं महाकाव्य निर्माण केलं आणि लोकमान्य टिळकांनी मंडालेला त्या सहा वर्षात भगवद्गीतेवर 'गीतारहस्य' नावाची एक अप्रतिम टीका लिहून काढली. त्यांना झोपलेल्या समाजाला जागं करायचं होतं. 'कर्मयोगी व्हा' म्हणून प्रवृत्त करायचं होतं म्हणून गीतेचा एक वेगळाच अर्थ टिळकांनी लावला आणि गीतारहस्य १९१७ साली प्रकाशित झालं.

मंडालेमध्ये हलाखीची परिस्थिती होती आणि टिळकांना मधुमेह जडला. नंतरची चार वर्ष तर टिळक फक्त सत्तूचे काही दाणे खाऊन राहात असत आणि अत्यंत धीरोदात्तपणे, अत्यंत स्थितप्रज्ञपणे त्यांनी श्रीमद भगवद्गीतेच तत्त्वज्ञान हे प्रत्यक्ष अंगीकारलं, प्रत्यक्ष आचरून दाखविलं आणि म्हणून त्यांच्या लेखणीतून 'गीतारहस्य' हा ग्रंथ प्रकाशित झाला. मध्यंतरी सत्यभामाबाई गेलेल्या होत्या. १९१६ ला टिळक जेव्हा पुण्यात परत आले तेव्हा एक जुनं प्रकरण उफाळून परत बाहेर आलं. चिरोल नावाच्या एका इंग्रज पत्रकाराने लोकमान्य टिळकांचे जे अत्यंत जाज्वल्य लेख 'केसरी' आणि 'मराठा' मध्ये प्रकाशित झालेले होते त्याचा अभ्यास करून टिळकांवर राजद्रोहाचा तिसरा खटला लावला आणि या वेळेला हा खटला लंडनमध्ये चालणार होता. १९१८ मध्ये टिळक विलायतेला गेले. १४ महिने टिळकांचं वास्तव्य लंडनमध्ये होतं आणि १९१९ साली नोव्हेंबर महिन्यात टिळक भारतात परत आले. त्या वेळेला टिळकांची प्रकृती खूप क्षीण झालेली होती. मधूमेहाने शरीर आंतर्बाह्य पोखरून टाकलेलं होतं. पण नोव्हेंबर महिन्यात टिळक मुंबईत परत आले. आणि डिसेंबरात ते अमृतसरला गेले. राष्ट्रीय काँग्रेस कमिटीची राष्ट्रीय बैठक त्या वेळेला अमृतसरला होणार होती म्हणून डिसेंबर महिन्यात ते अमृतसरला गेले. पुढे जानेवारी, फेब्रुवारी, मार्च आणि एप्रिल या चार महिन्यात त्यांनी सिंध प्रांताचा दौरा केला आणि एप्रिलमध्ये ते सोलापूरला स्थानिक समितीच्या सभेला गेले. मे महिन्यात ते परत वाराणसीला गेले आणि काशी यात्रा संपवून जून महिन्यात पुण्यात आले.

१९२० सालचा जून महिना होता. टिळकांची प्रकृती अत्यंत क्षीण झालेली होती. टिळकांनी जे काम केलं ते केवळ राष्ट्रहितासाठीच केलेलं होतं आणि जरी स्वत:ची प्रकृती इतकी क्षीण झालेली असली तरी टिळकांच्या मनात वेगळेच वेध लागलेले होते. त्या वेळेला जगन्नाथ पंडितांवर खटला उभा राहिलेला होता. जुलै महिन्यात ते मुंबईला गेले. हा खटला टिळकांनी स्वत: चालवला

आणि फक्त चालवला असं नाही तर २१ जुलै १९२० या दिवशी त्यांनी हा खटला जिंकला.

२० जुलैपासून टिळकांच्या अंगात ज्वर यायला लागला. १ ऑगस्ट १९२० रोजी टिळक पंचतत्त्वात विलीन होऊन गेले. पण अशी माणसं कधी जात नसतात. आपल्या कार्यातून, आपल्या विचारातून, आपल्या लेखनातून, आपल्या अनुयायांमधून, आपल्या शिष्यवर्गातून अशी माणसं आपला चिरंतन ठसा, आपली मुद्रा ही समाजावर उमटवून जात असतात. आज टिळकांच्या पूण्यस्मरणाचं हे शंभरावं वर्ष आहे. आणि आपण जर सामाजिक परिस्थिती पाहिली तर आजही आपल्या लक्षात येईल की टिळकांचे हे सगळे विचार समाजाला, राष्ट्राला किती पोषक आहेत, किती आवश्यक आहेत. आज सामाजिक परिस्थिती अत्यंत दु:खद आहे. आणि हे जर सर्व बदलायचं असेल तर त्याच्यासाठी आपण टिळकांचे जे विचार आहेत, सावरकरांचे जे विचार आहेत, छत्रपती शिवाजीमहाराजांचे जे तेज आहे ते अंगीकारले पाहिजे. अन्यथा हे सगळं व्यर्थ होईल.

मोठ्या लोकांच्या सगळ्या गोष्टी मोठ्याच असतात. विश्वनाथपंत, टिळकांचे थोरले चिरंजीव. प्लेगच्या साथीत जेव्हा त्यांचा मृत्यू झाला आणि ग.वि.केतकर जेव्हा टिळकांचे सांत्वन करायला गेले तेव्हा झालं उलटंच! टिळकांनीच त्यांचं सांत्वन करून त्यांना परत पाठवलं आणि टिळक म्हणाले, ''अहो, अख्ख्या गावाला आग लागली आहे तर आमच्या घरची पण एक गोणी जळाली इतकंच!''

आज लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यस्मरणाच्या शंभराव्या वर्षाच्या निमित्तानं त्यांच्या कार्याचा, कर्तुत्वाचा जो वाक्यज्ञ मांडला त्याच्यासाठी हे सुंदर व्यासपीठ निर्माण करून दिलं म्हणून मी आयोजकांचे, संयोजकांचे मन:पूर्वक आभार मानतो. परमपूजनीय काकामहाराज यांच्या चरणी सादर दंडवत अर्पण करतो आणि मला वाटतं, आपण सगळे तरुण स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या ओळी परत एकदा आपल्या मनात आठवू या,
''की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने । लब्धप्रकाश इतिहास–निसर्ग–माने । जे दिव्य दाहक म्हणुनि असावयाचे । बुद्ध्याची वाण धरिले करि हे सतींचे ।।''

आपण सर्वांच्या हातून देशकार्य घडो. आपणा सर्वांच्या हातून उत्तम शैक्षणिक कार्य घडो, उत्तम संशोधन कार्य घडो आणि त्यातून आपल्या राष्ट्रासाठी, आपल्या समाजासाठी काहीतरी उदात्त, काहीतरी भव्य निर्माण होवो अशी प्रार्थना त्या जगन्नियंत्याच्या चरणी करतो. परत एकदा मला जी संधी दिली त्याबद्दल संयोजकांचे मन:पूर्वक आभार मानतो. आणि इथे विरामतो.

छत्रपती शिवाजी महाराज की जय । लोकमान्य बाळ गंगाधर टिळक की जय । स्वातंत्र्यवीर सावरकर की जय । ''



*व्याख्यानासाठी उपस्थित श्रोतृवर्ग*

# बायोमेडिकल इंस्ट्रुमेंटेशन पदवी अभ्यासक्रमासाठी कार्यशाळा

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या समर्थ एजुकेशनल इन्स्टिट्युट, डेरवण येथे चालवल्या जाणाऱ्या बायोमेडिकल इंस्ट्रुमेंटेशन या पदवी अभ्यासक्रमासाठी एक कार्यशाळा दि. २७-०१-२०२० रोजी आयोजित करण्यात आली होती. ह्या कार्यशाळेसाठी ब्रिटिश वैद्यकीय पथकातील बायोमेडिकल इंजिनीअर श्री. जॉन वॉल आणि पुण्याच्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे डॉ. निरंजन खांबेटे ह्या बायोमेडिकल इंजिनीअरनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या समन्वयक म्हणून डॉ. नेहा देशपांडे यांनी काम सांभाळले.




*बायोमेडिकल इंजिनीअर श्री. जॉन वॉल कार्यशाळेत मार्गदर्शन करताना*

ह्या कार्यशाळेत सकाळच्या सत्रात डॉ. निरंजन खांबेटे यांनी क्लिनिकल इंजिनीअरिंग आणि रुग्णालयात वापरल्या जाणाऱ्या मशिन्सच्या वापराच्या सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी क्लिनिकल इंजिनीयरच्या कार्याबद्दल माहिती देताना, मशिन्सची कार्यक्षमता, चाचणी कशी करावी ह्याबद्दल विस्ताराने आणि विविध उदाहरणे देऊन माहिती दिली. विद्यार्थ्यांनी माहितीचे कोणते स्रोत कसे वापरावेत आणि स्वतःला कायम नवीन माहितीने समृद्ध कसे ठेवावे हे समजावले. ते म्हणाले की, क्लिनिकल इंजिनीअर हा डॉक्टर आणि मशिन यामधील उत्तम दुवा असायला हवा. या सर्व माहिती बरोबरच त्यांनी medical device regulation agencies बद्दल उपयुक्त माहिती सांगितली.


ह्या दरम्यान जॉन वॉल यांनी आपले रुग्णालयातील वैयक्तिक अनुभव, मशिन्स हाताळण्याच्या पद्धतीबद्दल माहिती दिली. कामाच्या वेळी सर्वप्रथम रुग्णाच्या सुरक्षिततेचा विचार झाला पाहिजे हे त्यांनी मुलांच्या मनावर ठसविले. रुग्ण, डॉक्टर, इतर स्टाफ आणि मशिन्स



*डॉ. निरंजन खांबेटे मार्गदर्शन करताना*

या सर्वांचा समन्वयक म्हणून काम पाहणे आवश्यक असते आणि अशा वेळी काम करताना आलेले त्यांचे अतिशय महत्त्वाचे अनुभव अतिशय रंजक पद्धतीने सांगून त्यांनी सर्वांचे मन जिंकले.

ह्या कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात जॉन वॉल यांनी रुग्णालयात बायोमेडिकल इंजिनीअरच्या भूमिकेवर भर देऊन जास्तीत जास्त वेळ मशिन्स कशी हाताळावीत, डॉक्टर्स व नर्स ह्यांच्याकडून मशिन्सबद्दल माहिती कशी गोळा करावी, इंटरनेट व सोशल मीडियाचा वापर आपल्या व्यावसायिक आयुष्यात कसा करावा यावर उत्तम माहिती दिली. शेवटच्या सत्रात, जॉन वॉल आणि निरंजन खांबेटे यांनी प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या भावी काळातील योजनेबद्दल विचारणा केली व त्याबाबतीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शेवटी डॉ. नेहा देशपांडे यांनी आभार व्यक्त केले.




*कार्यशाळेतील विद्यार्थी जॉन वॉल यांच्या मार्गदर्शनाखाली यंत्रदुरुस्ती करताना*

ह्या कार्यशाळेतून विद्यार्थ्यांना रुग्णालयातील मशिन्स हाताळणे व मशिन्सच्या विविध समस्या निवारण करणे, तसेच स्वतःबद्दलचा आत्मविश्वास व भाषा कौशल्य, बायोमेडिकल क्षेत्रातील सुवर्ण संधीचा उपयोग कसा करून घेता येऊ शकतो आदी विषयांवर मार्गदर्शनाचा लाभ झाला.

ह्या कार्यशाळेसाठी संचालिका सौ. शरयू यशवंतराव, प्राध्यापक वर्ग रोहन गुप्ते, सौ. श्रद्धा गुप्ते, प्रीती काकती व रजनीश वाघासीया हे उपस्थित होते. या सर्व कार्यक्रमाला डॉ. नेताजी पाटील आणि डॉ. सौ. सुवर्णा पाटील यांचे अनमोल सहकार्य लाभले. मुख्य विश्वस्त श्री. अशोकराव जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा संपन्न झाली.

ह्या कार्यशाळेनंतर दुसऱ्या दिवशी, जॉन वॉल यांनी, महाविद्यालयातील प्रयोगशाळेत, मशिनवर प्रात्यक्षिक दाखविले. ह्या प्रात्यक्षिकात एखाद्या जुन्या मशिनबद्दल माहिती नसताना, ते कसे हाताळावे व त्यातील समस्यांचे निवारण कसे करावे हे दाखविले. ह्या कार्यशाळेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## समर्थ एज्युकेशनल इन्स्टिट्युटच्या विद्यार्थिनींचे शोधनिबंध सादर

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या 'समर्थ एज्युकेशनल इन्स्टिट्युट'तर्फे चालविण्यात येणाऱ्या 'Bachelor of Psychological Health and Behavioural Science' या पदवी अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षामध्ये शिक्षण घेत असलेल्या कु. मलिहा हाशम साबळे या विद्यार्थीनीने दि. १० ऑक्टोबर २०१९ रोजी अहमदाबाद, गुजरात येथे आंतरराष्ट्रीय मानसिक आरोग्य परिषदेमध्ये “Aggression and Emotional Intelligence Among Undergraduate Students of Rural & Urban Areas” या विषयावर शोधनिबंध सादर केला.

सदर परिषदेमध्ये एकूण ५००० संशोधकांनी सहभाग नोंदविला होता. यापैकी ६०० शोधनिबंध निवडण्यात आले आणि प्रत्यक्ष १४० शोधनिबंध सादर करण्यात आले. त्यामध्ये मलिहा साबळे या विद्यार्थीनीचा शोधनिबंध समाविष्ट होता. या शोधनिबंधासाठी तिला मानसशास्त्र विभागाच्या डॉ. संयोगिता नाडकर्णी तसेच प्राध्यापक शरद पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

त्याचप्रमाणे 'Bachelor of Psychological Health and Behavioural Science' या पदवी अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षामध्ये शिक्षण घेत असलेल्या कु. आयुशी विरेन शाह या विद्यार्थीनीने



मलिहा साबळे रुग्णाशी बोलताना




मलिहा साबळेला मिळालेले प्रमाणपत्र

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com




*आयुषी शाह*

दि.२२ जानेवारी २०२० रोजी गांधीनगर, गुजरात येथे गुजरात फोरेन्सिक सायन्स विद्यापीठातर्फे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये “Stress and Achievement Motivation Among 12th std Students” या विषयावर शोधनिबंध सादर केला.

या परिषदेमध्ये जवळपास २००० संशोधकांनी शोधनिबंधासाठी त्यांचा सहभाग नोंदविला होता. यापैकी ४०० शोधनिबंध निवडण्यात आले होते. शोधनिबंधावर आधारित ७ पोस्टर्स ही ‘Poster Presentation’ साठी निवडण्यात आली होती. ज्यामध्ये कु.आयुशी शाह या विद्यार्थीनीने ‘Poster Presentation’ केले. हा शोधनिबंध “International Conference of Cognitive Neuroscience Society India (CNSI) तर्फे प्रकाशित केल्या जाणाऱ्या ‘Souvenir and Scientific Abstract’ मध्ये प्रकाशित करण्यात आला. या शोधनिबंधासाठी तिलाही मानसशास्त्र विभागाच्या डॉ. संयोगिता नाडकर्णी तसेच प्राध्यापक शरद पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.



GFSU
NAAC ACCREDITED 'A' GRADE
Gujarat Forensic Sciences University
Knowledge | Wisdom | Fulfilment
विद्यया अमृतं अश्नुते

Cognitive Neuroscience Society India

*International Conference on Emerging Trends in Cognitive Neurosciences: Forensics and Clinical Applications*

CERTIFICATE OF PARTICIPATION

This is to certify that ~~Prof./Dr./Mr./Mrs.~~/Ms. AYUSHI SHAH has participated in the International Conference on Emerging Trends in Cognitive Neurosciences: Forensic and Clinical Applications from 20–22 Jan 2020 as Delegate /Presenter/Invited Speaker/Session Chair organized by Institute of Behavioural Science (IBS), Gujarat Forensic Sciences University (GFSU), Gandhinagar, Gujarat under the auspices of Cognitive Neuroscience Society India (CNSI).

| Ms. Rosari Naveena S<br>Organizing Secretary<br>IBS, GFSU | Prof. Bindu M. Kutty<br>President<br>CNSI | Brig. Dr. K. K. Tripathi (Rtd.)<br>Director<br>IBS, GFSU |
|---|---|---|

*आयुषी शाहला मिळालेले प्रमाणपत्र*

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. । Visit us at https://swamisamarth.com/dervan/
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५, **संपादक मंडळ :** सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०